Akshardhara Research Journal
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
E ISSN -3048-8095 / Bimonthly / SJIF Impact- 3.4 / September-2025/ Special Issue 02 Volume I (A)

39

हरित बँकिंग

प्रा. योगिता हरी कोल्हे
भुसावळ कला,विज्ञान आणि पु.ओं नाहटा महाविद्यालय, भुसावळ.

प्रस्तावना :-

आजच्या युगात पर्यावरणाचे रक्षण करणे ही सर्वांची जबाबदारी आहे. बँकिंग क्षेत्र हे आर्थिक विकासाचे केंद्र आहे. त्यामुळे पर्यावरण बँकिंग सेवा सुरू करून ग्रीन बँकिंग या संकल्पनेचा उदय झाला आहे. ग्रीन बँकिंग म्हणजे अशा बँकिंग सेवा ज्या पर्यावरणाचे रक्षण करतात उर्जेची बचत करतात. आणि शाश्वत विकासाला चालना देतात ग्रीन बँकिंग ही एक नवीन संकल्पना आहे.

ग्रीन बँकिंगचा अर्थ :-

भारतातील ग्रीन बँकिंग आणि ग्रीन बँकेचे फायदे यावर लक्ष केंद्रित होते. आर्थिक वाढीवर बँकिंग उद्योगाचा परिणाम होतो. प्रमाण आणि दर्जा दोन्ही बाबतीत ज्यामुळे आर्थिक वाढीचे स्वरूप बदलते ग्रीन बँकिंग बँकांना त्यांच्या धोरण निर्मिती प्रक्रियेत प्रभाव पाडून उद्योगात स्पर्धात्मक धार मिळवण्यास मदत करू शकते. ग्रीन बँकिंग ही ऊर्जा वाचवण्याची आणि पर्यावरणाचे रक्षण करण्याची एक सक्रिय पद्धत आहे. ग्रीन बँकिंगचा प्राथमिक फायदा असा आहे की भविष्यातील पिढ्यांसाठी पर्यावरणाचे रक्षण करते ग्रीन बँकिंग शक्य तितक्या प्रमाणात कागदपत्रांचे काम कमी करते. आणि ग्राहकांकडून एटीएम, मोबाईल, बँकिंग आणि इतर प्रकारच्या इलेक्ट्रॉनिक बँकिंग वर लक्ष केंद्रित करते. इलेक्ट्रॉनिक व्यवहार केवळ शाश्वत ते योगदान देत नाही तर ते ग्राहक आणि बँका दोघांनाही सुविधा देतात ग्रीन बँकिंग म्हणजे "पर्यावरण पूरक पद्धतींना प्रोत्साहन देणे आणि बँकेच्या कार्बन प्रिंट कमी करणे" हे पारंपारिक बँकेसारखी आहे. कारण ते नैसर्गिक संसाधनाचे आणि पर्यावरणाचे संरक्षण आणि संवर्धनाच्या उद्देशाने सामाजिक पर्यावरणीय आणि पर्यावरणीय परीक्षण करते.

ग्रीन बँकिंगची संकल्पना :- "ग्रीन बँकिंग म्हणजे बँकेच्या दैनंदिन कामकाजात कागदाचा वापर कमी करणे पर्यावरण पूरक प्रकल्पांना कर्ज उपलब्ध करून देणे ऊर्जा बचत आणि पर्यावरणीय व्यवस्थापनाची अंमलबजावणी"

उद्दिष्टे :-

1) ग्रामीण भागात डिजिटल साक्षरतेचा अभाव
2) सुरक्षिततेच्या समस्या जाणून घेणे.
3) प्रारंभीचा जास्त खर्च
4)ग्राहकांचा विरोध
5) पृथ्वीवरील पर्यावरण अधिवास आणि संसाधनाची संवर्धन सुधारणा

गृहीतक :-

1) ग्रीन बँकिंगच्या वापरामुळे पर्यावरण संरक्षणाला सकारात्मक मदत मिळते.
2) डिजिटल व्यवहारामुळे बँकिंग क्षेत्रातील खर्च व वेळेची बचत होते.

संशोधन पद्धती :-

संशोधक आपल्या शोधनिबंधाचे संशोधन पूर्ण करण्यासाठी संदर्भ ग्रंथ, मासिके, वृत्तपत्र, प्रत्यक्ष पाहणे, विकिपीडिया , गुगल, यासारख्या साधनांचा वापर केलेला आहे.

शोधनिबंधाची मांडणी :-

1] **ग्रीन बँकिंग ची गरज** :-

1. पर्यावरण प्रदूषणावर नियंत्रण
2. शाश्वत विकास साध्य करणे
3. ऊर्जा बचत व कचरा कमी करणे
4. बँकिंग क्षेत्राचा कार्बन फुटप्रिंट कमी करणे
5. ग्राहकांना पर्यावरण पूरक सेवांचा लाभ

ग्रीन बँकिंग ची पद्धती :-

1) ऑनलाईन बँकिंग 2. मोबाईल बँकिंग व यूपीआय व्यवहार 3.ई स्टेटमेंट पासबुक 4.ग्रीन कर्ज पर्यावरण पूरक योजना 5.उद्योगांना बिल पुरवठा 6. पेपरलेस बँकिंग 7. सौर ऊर्जा वापरून एटीएम व शाखा चालवणे

भारतातील ग्रीन बँकिंगची उदाहरणे :- एसबीआय सौर ऊर्जा प्रकल्पांना कर्ज आयसीआयसीआय बँक स्टेटमेंट आणि पेपरलेस व्यवहार एचडीएफसी डिजिटल व्यवहारांना चालना आरबीआय ग्रीन बँकिंग मार्गदर्शक सूचना

ग्रीन बँकिंग चे फायदे :-

1. **पर्यावरण संरक्षण :-** कागदाचा वापर कमी होतो. झाडे वाचतात आणि कार्बन उत्सर्जन कमी होते.
2. **ब्रँड इमेज सुधारते :-** ग्रीन बँकिंग स्वीकारणाऱ्या बँकांची प्रतिमा समाजात चांगली बनते.
3. **खर्चात बचत :-**ऑनलाइन व्यवहारामुळे कागद प्रिंटिंग कुरियर इंधन यावर खर्च कमी होतो.
4. **वेगवान व सुरक्षित व्यवहार** :-डिजिटल बँकिंग मुळे वेळेची बचत होते आणि व्यवहार अधिक पारदर्शक होतात.
5. **ग्राहकांसाठी सुलभ व्यवहार** :-कुठूनही केव्हाही इंटरनेट बँकिंग मोबाईल बँकिंग मुळे व्यवहार करणे सोपे होतात. ब्रँड इमेज सुधारते ग्रीन बँकिंग स्वीकारणाऱ्या बँकांची प्रतिमा समाजात चांगली बनते.
6. **शाश्वत विकासाला चालना** :- बँका पर्यावरण पूरक प्रकल्पांना कर्ज देतात त्यामुळे टिकाऊ विकास होतो
7. **प्रदूषण कमी** :- इलेक्ट्रॉनिक बँकिंगमुळे प्रवासाची गरज कमी होत असल्याने हवेतील प्रदूषण घटते
8. **ऊर्जेची बचत** :- ही बँकिंग मुळे बँकेच्या शाखांवरील गर्दी व विजेचा वापर कमी होतो

निष्कर्ष :-

1) ग्रीन बँकिंग ही आजच्या युगातील गरज आहे
2) पर्यावरण पूरक शाश्वत आणि डिजिटल व्यवहारांमुळे बँकिंग क्षेत्राचे पर्यावरणीय नुकसान कमी होईल
3) भारतात ग्रीन बँकिंगचा अवलंब वाढविणे हे बँक शासन आणि ग्राहक यांची संयुक्त जबाबदारी आहे

शिफारशी :-

1) ग्रामीण भागात डिजिटल व्यवहारांची जागरूकता वाढवावी
2) बँकांनी अधिकाधिक ग्रीन कर्ज योजना सुरू कराव्यात
3) ग्राहकांना प्रोत्साहन योजना द्याव्यात
4) शासनाने ग्रीन बँकिंग साठी कर सवलती द्याव्यात

संदर्भसूची :-

1. www.rbi.org.in
2. www.iba.org.in
3. www.researchgate.net